# राष्ट्रीय सेवा योजना

## अहवाल

### हिवाळी श्रमसंस्कार शिबीर २०१४-१५
### मु.पो - त्र्यंबकेश्वर (नाशिक)
### दि.१५ डिसेंबर २०१४ ते २१ डिसेंबर २०१४

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,राष्ट्रीय सेवा योजना व म.वि.प्र.समाजाचे सी.एम.सी.एस.महाविद्यालय,नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने हिवाळी श्रमसंस्कार शिबीर मु.पो - त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथे दि. १५ डिसेंबर २०१४ ते २१ डिसेंबर २०१४ या कालावधीत संपन्न झाले. शिबीरात २५ स्वयंसेवक ,१ कार्यक्रम अधिकारी व १ शिपाई सहभागी झाले होते.

**पहिला दिवस :-** शिबीराच्या ठिकाणी उद्घाटनाची तयारी सुरू करून त्र्यंबकेश्वर पोलीस स्टेशन येथे निवास व्यवस्था व जेवणाची तयारी केली. शिबीराचे उद्घाटन म.वि.प्र.समाज संस्थेच्या सरचिटणीस श्रीमती.निलीमाताई पवार यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून निर्मलग्राम निर्माण केंद्राचे अध्यक्ष श्री.श्रीकांत जावरेकर उपस्थित होते.त्र्यंबकेश्वर नगराध्यक्षा श्रीमती. अलकाताई शिरसाठ,म.वि.प्र.समाजाचे चिटणीस डॉ.सुनिल ढिकले,संचालक श्री. मुरलीधर पाटील,श्री. दिलीप पाटील तसेच त्र्यंबकेश्वर नगरपालिकेचे CEO श्री. नागरे साहेब,श्री. कैलास घुले, श्री. यादवराव तुंगार,प्राचार्य डॉ.दिलीप धोंगडे,डॉ.बी.जी.वाघ व प्राचार्य डॉ.एस.एन.शिंदे उपस्थित होते.सर्वांनी शिबीरासाठी शुभेच्छा देऊन स्वयंसेवकांनी उन्नतीसाठी काम करावे असा संदेश दिला.

**दुसरा दिवस :-** सकाळी प्रार्थना,व्यायाम व राष्ट्रीय सेवा योजना गीत सादर करून श्रमदान कार्यक्रमास कुशावर्त येथे गायधनी गल्ली परिसरात स्वच्छता मोहीम राबविली तसेच तेथील नागरीकांना स्वच्छता कशी ठेवावी यासंदर्भात प्रबोधन केले. दुपारच्या सत्रात पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र जाधव यांनी रस्ता सुरक्षा व युवक या विषयावर व्याख्यान केले.अपघात व रस्ते ओलांडताना काय काळजी घ्यावी इ. संदर्भात आपण सर्वांनी जनतेपर्यंत पथनाट्य,संवाद साधुन प्रबोधन करावे असा संदेश दिला. श्री. भगवान सुर्यवंशी,शिक्षण उपसंचालक नाशिक यांनी शिक्षण आणि समाजजागृती या विषयावर व्याख्यान दिले. शिक्षणामुळे त्यांच्याबरोबरच त्यांचा परिवार विकसित होतो असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

**तिसरा दिवस :-** सकाळी प्रार्थना,योगासने व व्यायाम मखमलाबाद कॉलेजचे कार्य.अधिकारी प्रा.गोरक्षनाथ पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. के.टी.एच.एम.कॉलेज ज्युनियर विभागाचे कार्यकारी अधिकारी व विभागीय समन्वयक प्रा. अशोक सोनवणे, जिल्हा समन्वयक प्रा.एस.टी.घुले व कार्यक्रम अधिकारी प्रा.ए.के.मोगल यांच्या मार्गदर्शनाखाली सी.एम.सी.एस.महाविद्यालयाच्या कॉलेजच्या स्वंयसेवकांनी गोदावरी ,अहिल्या देवी नदी स्वच्छ करण्याचा निर्धार केला.व तशी शपथ घेऊन श्रमदान कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. दुपारच्या सत्रात त्र्यंबकेश्वर येथील डॉ.सत्यप्रकाश शुक्ला यांनी युवक व समाज या विषयावर व्याख्यान दिले रात्री सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

चौथा दिवस :- प्रार्थना रासेयो गीत व योगाचे महत्व याबददल प्रा.अशोक सोनवणे व प्रा.एस.टी.घुले सर यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करुन अहिल्या देवी व गोदावरी नदी स्वच्छता अभियान कार्यक्रम सुरु करण्यात आला. दुपारच्या सत्रात दैनिक सकाळ संपादन प्रसारमाध्यमे व युवक या विषयावर व्याख्यान देउन प्रसार माध्यमात युवक कशाप्रकारे सक्रिय सहभाग घेउ शकतात याबददल सांगीतले सकाळ वर्तमानपत्रात स्वच्छता अभियानाची बातमी देउन विद्यापिठ व संस्थेला धन्यवाद दिले.

**पाचवा दिवस :-** सिडको महाविद्यालयातिल कार्यक्रम अधिकारी जिल्हा समन्वयक.प्रा.एस.टी.घुले यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो गीत व प्रार्थना व व्यायाम घेण्यात आला. श्रमदान कार्यक्रमात गोदावरी ,अहिल्या देवी नदी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. म.वि.प्र.सरचिटणिस श्रीमती.निलीमाताई पवार यांनी भेट देवून स्वच्छता मोहीमेचे कौतुक केले. रासेयो योजनेतिल सर्वांना पाहुन धन्यवाद दिले व स्वंयसेवकांना शुभेच्या दिल्या तसेच कोणत्याही कामाची लाज न वाटता ती प्रामाणिक प्रमाने करावे असे सांगीतले दुपारच्या सत्रात जिल्हा पो.अधिक्षक श्री.संजय मोहीते यांनी राष्ट्रउभारणीत युवकांचे स्थान यास विषयांवर व्याख्यान झाले. पोलीस भरती प्रक्रियेत रासेयो ची महत्वाची भुमिका आहे. स्पर्धा परिक्षांमध्ये स्वंयसेवकांनी सहभागी घेण्याचे आव्हान केले रात्री त्र्यंबकेश्वर परिसरात पथनाट्याद्वारे जनजागृती केली.प्राचार्य एस.एन.शिंदे यांनी शिबीराला भेट देऊन स्वयंसेवकांसाठी केलेल्या व्यवस्थेची पहाणी केली व केलेल्या कामाचा आढावा घेतला. केलेल्या कामाचे कौतुक करुन समाजाप्रतीचे ऋण फेडण्यासाठी काम करा असा संदेश दिला.

**सहावा दिवस** :- रासेयो गीत प्रार्थना व्यायाम व योगासने झाल्यानंतर श्रमदान कार्यक्रमात अहिल्यादेवी नदीपात्रात ट्रॅक्टरमध्ये कचरा जमा करुन नदीपात्र स्वच्छ करण्यात आले. संपूर्ण नदीपात्र स्वच्छ झाल्यामुळे सर्वांनी आनंद व्यक्त केला व येणा-या सिंहस्थ कुंभमेळयाच्या पाश्र्वभुमीवर सेवा करण्याची संधी मिळाली याबददल प्रत्येकजण स्वत:ला धन्य समजत होता. गोदावरी अहिल्या या नदया आपले दैवत आहे. त्यांची स्वच्छता करणे हे प्रतेकाचे कर्तव्य आहे. परिसर,नदीपात्र सुंदर व स्वच्छ झाले. यामुळे परिसरातील ग्रामस्थांनी व पर्यटकांनी समाधान व्यक्त केले. दुपारच्या सत्रात प्रा.अशोक सोनवणे यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्यक्रमाबददल माहिती सांगीतली व संत गाडगेबाबा यांची पुण्यतीथी साजरी करुन त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. रात्री सांस्कृतिक कार्यक्रम स्वंयसेवकांनी सादर केला .

**सातवा दिवस** :- शिबीराचा समारोप कार्यक्रमाची तयारी करण्यात आली. नाशिक विभागाचे महसुल आयुक्त श्री.एकनाथ डवले साहेब, श्री.पोपटराव पवार कार्यध्यक्ष आदर्श ग्राम.महाराष्ट्र राज्य राज्यसंपर्क अधिकारी डॉ.अतुल साळुंखे विद्यापिठाचे समन्वयक डॉ.संजयकुमार दळवी,म.वि.प्र.सरचिटणिस निलिमाताई पवार,डॉ.तुषार शेवाळे,डॉ.बी.जी.वाघ,डॉ.दिलीप धोंडगे,श्री.कैलास घुले,श्री.एस.एम.नागरे साहेब,श्री.बहीरम साहेब इ.मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी स्वंयसेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. हे शिबीर म.वि.प्र समाजाच्या शतकमहोत्सवाचा एक भाग म्हणून शिबीर घेण्यात आले होते. श्रम व संस्काराचे महत्व पत्येकानी शिकले पाहिजे व सर्वांनी समाजासाठी राष्ट्रासाठी आपले कर्तव्य पार पाडले व ते यशस्वी केले. याबददल सर्वांनी कौतुक केले व प्रशंसा केली. सर्व कार्यकारी अधिकारी व प्रशासकिय यांचे सर्वांनी आभार व्यक्त केले.

AKMogal

(प्रा.ए.के.मोगल)
कार्यकारी अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

C.S. COLLEGE NASHIK

(डॉ एस.एन.शिंदे)
प्राचार्य
प्र. प्राचार्य
कॉमर्स, मॅनेजमेंट ॲन्ड
कॉम्प्युटर सायन्स (सी.एम्.सी.एस.) कॉलेज,
नाशिक-४२२ -१३.